सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २१५ | सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





**श्री. गणेश भामरे**
केशव मिडिया/पोलीस पाटील, बाम्हणे



**श्री. अथर्व कुलकर्णी**
अमळनेर



**श्री. सूरज सराफ**
फायनांशिअल प्लॅनर



**प्रा. धनंजय कुलकर्णी**
अमळनेर

# बेलापूरकर महाराजांचे दिंडीचे आगमन

## आज रथोत्सव : नामस्मरण व वारकरी चळवळीची पताका

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील श्री संत सखाराम महाराज यांचे शिष्य हभप मोहन महाराज बेलापूरकर यांचे रविवारी सकाळी शहराच्या वेशीवर आगमन झाले.

परंपरेनुसार शहरात जल्लोषात स्वागत करण्यात आले. शेकडो वर्षांनंतरही गुरु-शिष्याची ही परंपरा आजही कायम चालू असून या निमित्ताने पांडुरंग श्री बेलापूरकर महाराज यांच्या रूपाने शहरात येत असल्याची भक्तगणांची भावना आहे. श्री प्रसाद महाराज यांनी शहराच्या वेशीवर जाऊन स्वागत केले. आर. के. नगर प्रवेशद्वार जवळील गणपती मंदिरात पहिली पानसुपारी घेऊन दिंडी वाजतगाजत वाडी संस्थानाकडे रवाना झाली.

बेलापूरकर महाराज यांच्या गादीवरील पुरुष मोहन महाराज बेलापूरकर यांचे शनिवारी रात्री अमळनेर मध्ये रात्री आगमन झाले होते. रात्री मुक्काम करून मोहन महाराज बेलापूरकर हे २६ रोजी सकाळी सात वाजता वाजतगाजत वाडी संस्थानाकडे रवाना झाले. गुरुने शिष्याचे स्वागत करण्याची अडीचशे वर्षांची परंपरा अजून कायम आहे. या ठिकाणी दोन्ही महाराजांची पाद्य पूजा करण्यात आली. त्यानंतर प्रसाद महाराज व बेलापूरकर महाराज सजवून बैलांनी जुंपलेल्या शिग्राम मध्ये बसले. सोबत वारकऱ्यांची दिंडी टाळ मृदुगांच्या गजरात दिंडी वाडी संस्थानाकडे रवाना झाली. रस्त्यात नागरिकांनी ठिकठिकाणी भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. यावेळी विश्वस्त दिलीप देशमुख, रवींद्र माधवराव देशमुख, रवीकांत देशमुख राहुल देशमुख, रवींद्र देशमुख, हभप शारंगधर बुवा वारकरी पाठशाळेतील विद्यार्थी व श्री. अभय गुरुजी वेद पाठ शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. दिंडीने विजय मारुती मंदिरात दर्शन घेतल्यावर बसस्थानक, पाचपावली देवी मंदिर मार्गे बोरी नदी पात्रात सकाळी साडे नऊ वाजेच्या सुमारास उतरली.



*अमळनेर : आर. के. नगरकडून वाडी संस्थानाकडे जाताना भाविक मंडळींसमवेत प. पू. संतश्री प्रसाद महाराज व ह. भ.प. मोहन महाराज बेलापूरकर.*



*मिरवणूकीत सहभागी वारकरी संप्रदायाचे भाविक.*

### शेकडो वर्षांची परंपरा

संत सखाराम महाराजांच्या रथोत्सवाला शेकडो वर्षांची परंपरा आहे. हा रथ अतिशय उंच असून, तो मलबार सागाच्या लाकडापासून बनवलेला आहे. वाडी संस्थानचे दुसरे गादी पुरुष गोविंद महाराज यांनी १८१९ मध्ये रथोत्सवाची परंपरा सुरू केली. रथाला नाड्यांनी ओढण्याची परंपरा आहे. हा रथ बाळकृष्ण महाराजांनी तयार केलेला असल्याने, त्यावर बाळकृष्ण महाराज, गुरुकृष्ण असे लिहिलेले आहे



### आज स्थोत्सव होणार

अमळनेरचे वैभव असलेले संत सखाराम महाराज संस्थान रथोत्सव आणि सामाजिक एकात्मतेचे प्रतीक म्हणून ओळख असलेल्या अमळनेर नगरीतील संत सखाराम महाराज वाडी संस्थानचा रथोत्सव आज पार पडणार आहे. रथोत्सवाची यंदा जय्यत तयारी करण्यात आली आहे. वाडी संस्थानमधून सायंकाळी ६.३० वाजता रथोत्सवास सुरुवात होईल. वाडी चौक, सराफ बाजार, दगडी दरवाजा, फर्शी पुल, पैलाड, कसाली मार्गे रथ रात्रभर गावात फिरून सकाळी ७ वाजेपर्यंत रथ आपल्या स्थानी येईल, रथामध्ये श्री भगवान लालजींची मूर्ती ठेवली जात असते. रथाच्या मागे प.पू. प्रसाद महाराज अनवाणी पायी चालतात. रथोत्सवानंतर तीन दिवसांनी म्हणजेच तारखेला पालखी मिरवणूक असून एक महिना यात्रोत्सव असतो.

**शाहू महाराज बेलापूरकर यांना विठ्ठलाने दिला स्वप्न दृष्टांत**

संत सखाराम महाराजांचे शिष्य शाहू महाराज बेलापूरकर हे दरवर्षी पंढरपूर वारी करायचे. त्यांच्या स्वप्नात विठुराया आले. त्यांनी सांगितले की, वैशाखात मी अमळनेरला असतो.

# अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या योजनांना डिजिटल बळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या व्याज परतावा योजनेतून राज्यातील मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास घटकांना मोठा दिलासा मिळत आहे. आतापर्यंत सुमारे १६७० कोटी रुपयांचे सहाय्य वितरित करण्यात आले असून १.७० लाखांहून अधिक लाभार्थ्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.लाभार्थ्यांना त्वरित,अचूक व पारदर्शक माहिती मिळावी यासाठी महामंडळाने डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढविला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित डार्सी ही संकेतस्थळावर २४ तास उपलब्ध असून योजना,पात्रता, कागदपत्रे व अर्ज प्रक्रियेबाबत मार्गदर्शन देत आहे. तसेच वॉट्सऍप सेवेमुळे अर्जाची स्थिती, मंजुरी व व्याज परताव्याबाबतची माहिती थेट मोबाईलवर मिळत आहे.याशिवाय, वॉट्सऍप चॅनेलद्वारे विविध उपक्रम, परिपत्रके व शासन निर्णयांची माहितीही लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. नवी मुंबईतील पनवेल येथे सुमारे १.५ एकर जागेवर अत्याधुनिक बहुउद्देशीय मुख्यालय उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये प्रशासकीय कार्यालय, प्रशिक्षण व कौशल्य विकास केंद्र, लाभार्थी सहायता केंद्र आदी सुविधा उपलब्ध होणार आहेत. यामुळे महामंडळाचे कामकाज अधिक गतिमान व सुलभ होण्यास मदत होणार असल्याचे अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

# कृषी निविष्ठा विक्रेत्यांचा खरीप पूर्व प्रशिक्षण वर्ग

## आढावा सभेत खरीप हंगाम उपाययोजनांवर चर्चा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात, तालुक्यातील कृषी निविष्ठा विक्रेते यांचे खरीप पूर्व प्रशिक्षण वर्ग व आढावा सभा नुकतीच पार पडली.

सदर प्रशिक्षणास जळगावचे कृषि विकास अधिकारी पद्मनाभन म्हस्के, उपविभागीय कृषी अधिकारी प्रदीप निकम, मोहीम अधिकारी अविनाश खैरनार, चंद्रकांत ठाकरे, तालुका गुणनियंत्रण अधिकारी सचिन वानखेडेकर, पंचायत समिती कृषी अधिकारी देवेंद्र ठाकूर व जिल्हा परिषदेचे कृषी अधिकारी राहुल महाजन उपस्थित होते. यावेळी खरीप 2026 च्या दृष्टीने येणाऱ्या अडचणी व करावयाच्या उपाययोजना याविषयी सविस्तर चर्चा झाली. सदर प्रशिक्षणास अमळनेर तालुक्यातील कृषी निविष्ठा विक्रेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संघटनेचे अध्यक्ष योगेश पवार, धरणीधन कृषि केंद्राचे विजय जैन, रवींद्र पाटील व इतर सर्वांनी परिश्रम घेतले.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!
जय स्वदेशी...!!

# एस.पी. श्रीकांत धिवरे ॲक्शन मोडवर

## जळगाव जिल्ह्यात १३ जणांवर गुन्हे, अमळनेरात कारवाईची प्रतिक्षा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



जळगाव जिल्ह्याचे नूतन पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी सूत्रे हाती घेताच जिल्ह्याला शिस्त लावण्यासाठी धडक कारवाई सुरू केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात 'मेगा कोम्बिंग ऑपरेशन' राबवण्यात आले. या कारवाईत प्रथमच उघड्यावर मद्यपान करणाऱ्यांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले असून, अमळनेर येथे मात्र उघडल्यावर मद्यपान करणाऱ्यांवर आळा बसण्यासाठी पोलीस सरसावले पाहिजे यासाठी अमळनेरकर पोलीस काय दिशा ठरवतात याकडे लक्ष आहे.

पोलिसांच्या या मोहिमेत जिल्ह्यातील ५९ अत्यंत महत्त्वाच्या नाकाबंदी पॉइंट्सवर ४८ पोलीस अधिकारी आणि २१६ पोलीस अंमलदारांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येक संशयित वाहनाची आणि व्यक्तीची कसून तपासणी करण्यात आली. पहिल्यांदाच अशा प्रकारे उघड्यावर मद्यप्राशन करताना आढळलेल्या १३ जणांवर १५ गुन्हे (केसेस) दाखल करण्यात आले आहेत.

### अधीक्षकांचा 'दबंग' पॅटर्न

पदभार स्वीकारल्याच्या पहिल्याच आठवड्यात श्रीकांत धिवरे यांनी राबवलेल्या या मोहिमेमुळे गुन्हेगारांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. "जिल्ह्यातील सार्वजनिक शांतता आणि सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अशा मोहिमा यापुढेही सातत्याने राबवण्यात येतील," अशी माहिती पोलीस प्रशासनातर्फे देण्यात आली आहे.

# एकाला लाथाबुक्यांनी केली मारहाण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : लहान मुलांचे भांडण आवरायला गेलेल्या गणेश पांडुरंग माळी यांना जगदीश मगन महाजन यांनी लाथाबुयांनी मारहाण करून शिवीगाळ केल्याची घटना २१ रोजी सायंकाळी साडे सहा वाजेच्या सुमारास अमलेश्वर नगर माळीवाडा भागात घडली. गणेशने अमळनेर पोलीस स्टेशनला फिर्याद दिल्यावरून भारतीय न्याय संहिता कलम २९६, ११५(२), ३५१(२), ३५२ प्रमाणे जगदीश विरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# ८० फुटी रस्ता बनला तळीरामांचा अड्डा

## नागरिक त्रस्त, पोलीस कारवाईची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहराच्या मध्यभागातून जाणाऱ्या ८० फुटी रस्त्यावर रात्रीच्या वेळी तळीरामांचा वावर वाढल्याने या रस्त्याला अक्षरशः ओपन बारचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पालिका व पोलिस प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

शहरातील अंतर्गत दळणवळण सुधारण्यासाठी शासनाच्या सुमारे ७० कोटी रुपयांच्या निधीतून पालिकेमार्फत ८० फुटी (रिंगरोड) रस्त्याचे काम सुरू आहे. काही ठिकाणी काम पूर्ण झाले असले तरी काही भाग तांत्रिक अडचणींमुळे रखडलेला आहे. या रस्त्यामुळे शिंदखेडा रोड, धुळे रोड आणि पारोळा रोड हे मार्ग शहराशी जोडले जाणार आहेत. रस्त्याचे काम अपूर्ण असतानाही काही भागांवर नागरिकांकडून वाहतूक सुरू करण्यात आली आहे. ढेकू रोड ते गलवाडे रस्ता तसेच धुळे रोड ते पिंपळे रस्ता या पट्ट्यात सकाळ-सायंकाळ फिरण्यासाठी नागरिकांची मोठी वर्दळ असते. मात्र या रस्त्यावर अद्याप पथदिव्यांची व्यवस्था नसल्याने रात्रीच्या वेळी अंधाराचे साम्राज्य पसरते. याचाच फायदा घेत रात्री ८ ते १२ दरम्यान तळीराम येथे जमून दारू पितात. मद्यधुंद अवस्थेत आरडाओरडा, काचेच्या बाटल्या फोडणे असे प्रकार सर्रास घडत असून काही ठिकाणी गांजा सेवनाचाही प्रकार वाढल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सामान्य नागरिक व विशेषतः महिलांना त्रास सहन करावा लागत आहे. या परिसरात सोनसाखळी चोरीच्या घटनाही घडल्याची माहिती समोर आली आहे.बिअर बार व परमिट रूममध्ये अल्पवयीनांना प्रवेश नसल्याने अनेक अल्पवयीन मुले मोकळ्या जागेत बसून मद्यपान करत असल्याचेही निदर्शनास आले आहे. यात दहावी-बारावीतील विद्यार्थ्यांचाही समावेश असल्याने पालकांनीही दक्ष राहण्याची गरज व्यक्त केली जात आहे.





शहरातील ज्या ज्या भागात असे प्रकार होत असतील, त्या त्या भागात पोलिसांची गस्त वाढवली जाईल. दोषींवर कठोर कारवाई केली जाईल. सामान्य नागरिकांना व महिलांना त्रास होणार नाही याची काळजी पोलिस प्रशासन घेईल.

**दत्तात्रय निकम,**
पोलिस निरीक्षक, अमळनेर

# अतितापमान वाढीमुळे जनजीवन होरपळले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : यंदाचा उन्हाळा अत्यंत कडक आहे. गत काही दिवसांपासून तापमानाचा पारा ४० ते ४१ अंशांवर पोहोचला आहे. सूर्य आग ओकत असल्याने ग्रामीण भागांतील जनजीवनच होरपळले आहे. उष्णतेने सर्वच हैराण झाले आहेत.अमळनेर तालुक्यात शेतकरी शेतीसाठी नागरटी करून तयार केली जात आहे. परंतु, तळपत्या सूर्याच्या चटक्याने सकाळच्या प्रहरी १० वाजेपर्यंत तसेच सायंकाळी ५ वाजेनंतरच शेतातील कामे उरकण्यावर शेतकऱ्यांचा भर आहे. परंतु, बांधकाम कामगार दिवसाही राबताना दिसत आहेत. हातावर कमाई असलेल्या मजुरांना काम केल्याशिवाय पर्याय नसल्याने कडक उन्हातदेखील महिला आणि मजूर काम करताना दिसत आहेत. शेतशिवारातही आता खरीप हंगामाच्या तयारीसाठी शेतकरी कामाला लागल्याचे दिसत आहे.त्यामुळे सकाळी काम, उन्हाच्या वेळी काहीक्षण विश्रांती, असा क्रम सुरू असल्याचे चित्र ग्रामीण भागात दिसून येत आहे. आग ओकणाऱ्या सूर्यामुळे मात्र सारेच त्रस्त झाले आहेत. 'काय चटका बसतोय बाबा उन्हाचा, असा उन्हाळा नको रे बाबा' अशाच चर्चा दिसत आहेत.उन्हाच्या चटक्याने पशुपक्षीही हैराण झाले असून पाणवठे असलेल्या ठिकाणी पक्ष्यांचे थवे आढळून येत आहेत. सकाळी व सायंकाळी नदीकाठावर हे पक्षी आढळून येत आहेत. या वेळेत जणू त्यांची शाळाच येथे भरल्याचा भास होत असतो. जंगली वन्यजीवही पाणवठ्यांच्या शेजारीच अधिक काळ घालविताना दिसत आहे.

**ग्रामस्थ त्रस्त, शेतशिवारही पडताहेत ओस**



## संपादकीय

# अर्थव्यवस्थेवरील वाढता दबाव आणि आरबीआयपुढील आव्हान

इराण आणि अमेरिका-इस्रायल यांच्यातील दोन आठवड्यांचा नाजूक शस्त्रसंधी आता संपत आला असून, पुढील मार्ग अनिश्चित दिसत आहे. तथापि, दोन्ही बाजू चर्चेसाठी उत्सुक आहेत ही एक दिलासादायक बाब आहे. उपराष्ट्रपती जे. डी. व्हान्स यांच्या नेतृत्वाखालील अमेरिकन शिष्टमंडळ दोन आठवड्यांत दुसऱ्यांदा पाकिस्तानात दाखल होण्याची शक्यता आहे.चर्चेची मागील फेरी अयशस्वी ठरली होती. यात गुंतलेले मुद्दे आणि दोन्ही बाजूंनी घेतलेली भूमिका पाहता, येत्या काही दिवसांत कायमस्वरूपी तोडगा निघेल की नाही हे अस्पष्ट आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीला नाकेबंदी करण्याच्या घेतलेल्या निर्णयामुळे परिस्थिती आणखी गुंतागुंतीची झाली आहे, तर दुसरीकडे इस्रायल आणि लेबनॉन यांनी राजनैतिक वाटाघाटी सुरू केल्या आहेत. त्यामुळे, येत्या काही दिवसांत घडामोडी कशा घडतात हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.यावर लवकरात लवकर तोडगा निघणे भारतासाठी विशेष महत्त्वाचे आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी गेल्या आठवड्यात प्रिन्स्टन विद्यापीठातील एका भाषणात नमूद केल्याप्रमाणे, भारताच्या कच्च्या तेलाच्या आयातीपैकी जवळपास निम्मा वाटा पश्चिम आशियाचा आहे, परदेशातून येणाऱ्या पैशांपैकी (रेमिटन्स) सुमारे ४० टक्के आणि निर्यातीपैकी सुमारे १६.५ टक्के वाटा पश्चिम आशियाचा आहे. मल्होत्रा यांनी रिझर्व्ह बँकेच्या धोरण व्यवस्थापन दृष्टिकोनावरही चर्चा केली.

हा मुद्दा येथे विचारात घेणे महत्त्वाचे आहे, विशेषतः जेव्हा मध्यवर्ती बँकेला चलन बाजारातील हस्तक्षेपाबद्दल अर्थशास्त्रज्ञ आणि भाष्यकारांकडून टीकेला सामोरे जावे लागले आहे. आशियाई आर्थिक संकटाच्या संदर्भात, त्यांनी सांगितले की रिझर्व्ह बँकेने आवश्यकतेनुसार हस्तक्षेप केला आणि अस्थिर निश्चित दरासाठी वचनबद्ध राहिली नाही. स्पष्टपणे, रिझर्व्ह बँकेने मोठा परकीय चलन साठा उभारला असूनही, या दृष्टिकोनात फारसा बदल झालेला नाही.केवळ अत्यधिक अस्थिरता नियंत्रित करण्यासाठी बाजारात हस्तक्षेप करणे, हे रिझर्व्ह बँकेचे घोषित धोरण आहे. उदाहरणार्थ, या आठवड्यात बँकेने रुपया डेरिव्हेटिव्ह बाजारावर लादलेले काही निर्बंध अंशतः मागे घेतले आणि हे उपाय तात्पुरते असल्याचे स्पष्ट केले.रिझर्व्ह बँक रुपयाला हळूहळू अवमूल्यन होऊ देत आहे, जे आवश्यक आहे. भारताला व्यवहार तोट्याचा सामना करावा लागत आहे आणि हे असंतुलन दूर करण्यासाठी रुपयाचे अवमूल्यन आवश्यक असेल. पश्चिम आशिया संकटाचे लवकर निराकरण झाल्यास चालू खात्यातील तूट नियंत्रित करण्यास आणि रुपयावरील दबाव कमी करण्यास मदत होईल.

तथापि, बाह्य आर्थिक परिस्थिती हा केवळ एक पैलू आहे. पश्चिम आशियातील संकटाचा परिणाम चलनवाढ आणि विकासाच्या निष्कर्षांवरही होईल. कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किमती अद्याप चलनवाढीच्या आकडेवारीत प्रतिबिंबित झालेल्या नाहीत, कारण किमतींमधील बदलांचा ग्राहकांवर होणारा थेट परिणाम मर्यादित राहिला आहे. तथापि, जर हे संकट अधिक काळ टिकले, तर किरकोळ किमतींमध्ये बदल करावा लागेल. सध्याच्या संदर्भात, गव्हर्नर म्हणाले, अशा पुरवठा धयाला योग्य चलनविषयक धोरणात्मक प्रतिसाद म्हणजे, जोपर्यंत त्याचे दुसऱ्या टप्प्यातील गतिशीलतेत रूपांतर होत नाही, तोपर्यंत पहिल्या टप्प्यातील परिणामाकडे दुर्लक्ष करणे.नियमांवर आधारित चलनविषयक धोरण आणि मध्यवर्ती बँकेकडून होणारा स्पष्ट संवाद प्रभावी ठरू शकतो. उदाहरणार्थ, सुमारे एक दशकापूर्वी लवचिक चलनवाढ लक्ष्यीकरण आराखडा स्वीकारल्यापासून भारतातील सरासरी एकूण चलनवाढीचे दर आणि अस्थिरता लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. तरीही, मध्यवर्ती बँकेने सतर्क राहिले पाहिजे.संकटाचा परिणाम लक्षणीय असू शकतो, कारण वाढलेल्या किमती, तसेच गॅसची उपलब्धता, यादेखील आर्थिक घडामोडींवर परिणाम करणाऱ्या समस्या आहेत. आतापर्यंत, मध्यवर्ती बँक आणि सरकार या दोघांनीही परिस्थिती चांगल्या प्रकारे हाताळली आहे. तथापि, जर हे संकट असेच चालू राहिले, तर परिस्थिती अधिक कठीण होऊ शकते.

# मतदान संपताच पेट्रोल २८ रुपयांनी महागणार?

## केंद्रसरकारच्या संकेताने सर्व सामान्य झाले हवालदिल



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

देशभरात पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत मोठी वाढ होणार असल्याच्या चर्चांनी सामान्य नागरिकांची झोप उडवली आहे. पाच राज्यांतील निवडणुकीचे मतदान संपल्यानंतर दरवाढ होण्याचा अंदाज काही संस्थांनी व्यक्त केला होता.त्यातच 'कोटक इन्स्टिट्यूशनल इक्विटीज'च्या एका रिपोर्टमध्ये मतदान संपताच पेट्रोल-डिझेलच्या दरात २५ ते २८ रुपयांची दरवाढ होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला.

या अहवालानंतर एकच खळबळ उडाली होती. या पार्श्वभूमीवर आता पेट्रोलियम मंत्रालयाने अधिकृत निवेदन जारी करून आपली भूमिका स्पष्ट केली आहे.पेट्रोलियम मंत्रालयाने इंधन दरवाढीच्या सर्व चर्चा फेटाळून लावल्या आहेत. मंत्रालयाने स्पष्ट केले की, पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढवण्याचा सध्या कोणताही प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन नाही. सोशल मीडियावर किंवा अहवालांमध्ये फिरणाऱ्या दरवाढीच्या बातम्या चुकीच्या आणि निराधार असल्याचे सरकारने म्हटले आहे.

२२ एप्रिल रोजी प्रसिद्ध झालेल्या 'कोटक'च्या रिपोर्टनुसार, पश्चिम आशियातील तणावामुळे जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती भडकल्या आहेत. हॉर्मुजच्या सामुद्रधुनीतून होणारा तेलपुरवठा विस्कळीत होण्याच्या भीतीने कच्च्या तेलाचे दर वाढले आहेत. भारताला कमी तेल खरेदी करूनही जास्त परकीय चलन मोजावे लागत आहे. तेल कंपन्यांवर दरमहा २७० अब्ज रुपयांचा अतिरिक्त बोजा पडत असल्याने, आर्थिक गणित जुळवण्यासाठी २८ रुपयांपर्यंत दरवाढ आवश्यक असल्याचे या अहवालात म्हटले होते.जर खरोखरच २५-२८ रुपयांची वाढ झाली असती, तर त्याचा थेट परिणाम भाजीपाला, वाहतूक आणि पर्यायाने महागाईवर झाला असता. मात्र, २९ एप्रिल रोजी मतदानाचा शेवटचा टप्पा आहे.

अखेरच्या टप्प्यातील मतदान संपल्यानंतर इंधन दरवाढ होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, सरकारने सध्यातरी दरवाढीचा कोणताही विचार नसल्याचे सांगून जनतेला मोठा दिलासा दिला आहे. तरीही, आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडींमुळे भविष्यातील इंधन दरांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



अमळनेर : मंगळग्रह सेवा संस्था येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दि.२६ रोजी प्रसारित मन कि बातचे सकाळी ११ वाजता प्रसारण ऐकण्यात आले. यावेळी सुरेश बाविस्कर, नंदकिशोर बिरारी, एस.एन.पाटील,मनोहर तायडे, संजय सोनावणे, संजय बिऱ्हाडे, राजेंद्र पाटील, संदीप केदार आदी उपस्थित होते.

# मन की बातमध्ये पंतप्रधान मोदींनी मांडले भारताच्या प्रगतीचे नवे आयाम

## ऊर्जा आणि पर्यावरण संवर्धनावर भर

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दि.२६ रोजी मन की बात या कार्यक्रमाच्या १३३ व्या भागाद्वारे देशवासियांशी संवाद साधला. आपल्या संबोधनात पंतप्रधानांनी भारताच्या वैज्ञानिक क्षेत्रातील प्रगती, ऊर्जेचे नवनवीन स्रोत, आगामी जनगणना आणि आध्यात्मिक विचारांच्या प्रासंगिकतेवर विशेष प्रकाश टाकला.

पंतप्रधानांनी स्वदेशी बनावटीच्या कल्पक्कम ब्रीडर रिएक्टरच्या यशस्वी कामगिरीचे विशेष कौतुक केले. हे तंत्रज्ञान केवळ वीज निर्मितीसाठीच नाही, तर भविष्यातील इंधनाची गरज भागवण्यासाठीही अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.भारताने पवन ऊर्जा क्षेत्रात मोठी मजल मारली असून, देशाची क्षमता आता ५६ गीगावाटच्या पुढे गेली आहे. यामध्ये गुजरात, तमिळनाडू, महाराष्ट्र आणि राजस्थान या राज्यांचे योगदान मोलाचे ठरत असून, जागतिक स्तरावर भारत आता चौथ्या क्रमांकावर पोहोचला आहे.देशात सध्या सुरू असलेली जनगणना ही जगातील सर्वात मोठी जनगणना असल्याचे नमूद करत, पंतप्रधानांनी या प्रक्रियेतील पारदर्शकतेवर भर दिला. नागरिकांना आपली माहिती डिजिटल स्वरूपात स्वतः नोंदवण्याची सुविधा उपलब्ध करून दिल्याने ही प्रक्रिया अधिक सुलभ आणि अचूक झाली आहे.आगामी बुद्ध पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर त्यांनी भगवान बुद्धांच्या शांती, करुणा आणि ध्यानाच्या शिकवणुकीचा गौरव केला. आजच्या जागतिक संघर्षाच्या काळात बुद्धांचे विचार अधिक प्रासंगिक असल्याचे त्यांनी सांगितले.पर्यावरण संवर्धनासाठी लोकसहभागाचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी कर्नाटकच्या 'कर्मा मठ' आणि कच्छच्या रानातील राजहंसांच्या स्थलांतराची उदाहरणे देऊन नागरिकांच्या सकारात्मक प्रयत्नांची दखल घेतली.

पंतप्रधानांच्या या संवादाने देशातील वैज्ञानिक प्रगती आणि सामाजिक बांधिलकीची सांगड घालत, विकासाच्या दिशेने एकत्रित पावले उचलण्याचे आवाहन केले आहे.

# एनएमएमएस परीक्षेत जी. एस. हायस्कूल व साने गुरुजी विद्यालयाचा डंका

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या एनएमएमएस (राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती) परीक्षेत अमळनेर येथील जी. एस. हायस्कूल आणि साने गुरुजी नूतन माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक कामगिरी करत यशाचा नवा उच्चांक गाठला आहे. या विद्यार्थ्यांनी जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवत शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.जी. एस. हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी जिद्दीच्या जोरावर जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत स्थान पटकावले. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये देशमुख मिहीर मनोजकुमार (जनरल १० वा), महाले धीरज जीवन (एससी ४० वा), सपकाळे हिमेश दिनेश (एससी ५८ वा) आणि बोरसे अभिजित विजय (जनरल १७० वा) यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना शिक्षक श्री. एस. ए. खांजोडकर व सर्व शिक्षकवृंदांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

साने गुरुजी नूतन माध्यमिक विद्यालयानेही या परीक्षेत विशेष यश मिळवले आहे. शाळेतील ७४ विद्यार्थ्यांपैकी ३९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, त्यापैकी १५ विद्यार्थ्यांची निवड थेट गुणवत्ता यादीत झाली आहे. तसेच, साने गुरुजी कन्या हायस्कूलच्या संजना अहिरे हिनेही गुणवत्ता यादीत स्थान मिळवून शाळेचा गौरव वाढवला आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता ९ वी ते १२ वीपर्यंत दरमहा १००० रुपये, याप्रमाणे एकूण ४८ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे. या यशासाठी मुख्याध्यापक सुनील पाटील, शिक्षक डी. ए. धनगर यांचे मार्गदर्शन लाभले, तर तांत्रिक मदत मुस्ताक शेख व शुभम निकम यांनी केली.

या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. साने गुरुजी विद्यालयाच्या कार्यक्रमात संदीप घोरपडे यांच्या अध्यक्षतेखाली हेमकांत पाटील, ॲड. अशोक बाविस्कर आदी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.जी. एस. हायस्कूलच्या यशाबद्दल खान्देश एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष श्री. निरज अग्रवाल, कार्योपाध्यक्ष श्री. जितेंद्र जैन, शाळा समिती चेअरमन श्री. हरी भिका वाणी, मुख्याध्यापक श्री. व्ही. एम. पाटील, उपमुख्याध्यापक श्री. ए. डी. भदाणे, पर्यवेक्षक श्री. सी. एस. सोनजे व श्री. एस. आर. शिंगाणे तसेच सर्व संचालक मंडळाने विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. दोन्ही शाळांमधील शिक्षक, पालक आणि पदाधिकारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



अमळनेर : सानेगुरूजी नूतन माध्यमिक विद्यालयातील यशस्वी विद्यार्थ्यांसह शिक्षक व कर्मचारी.

# हवामान बदलाच्या जागतिक चर्चेत अमळनेरचा सहभाग



## शंतनू वाघमारे ठरले स्थानिक आवाजाचे दुवा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : अमळनेरचे शंतनू वाघमारे यांनी अलीकडेच ग्लोबल सिटिझन असेंब्ली मध्ये सहभाग घेतला. जानेवारी ते मार्च दरम्यान झालेल्या या कार्यक्रमात जगभरातील लोक हवामान बदल आणि अन्न व्यवस्थेबद्दल चर्चा करतात.आधार संस्था यांच्या मदतीने शंतनूंनी स्थानिक अनुभव जागतिक स्तरावर मांडले.

संस्थेने कागदपत्रे, समन्वय आणि स्थानिक माहिती देण्यात मदत केली. गावांमध्ये आणि छोट्या शहरांमध्ये हवामान बदलाचा काय परिणाम होतो जसे वाढती उष्णता, बदलते ऋतू हेही मांडण्यात आले. शंतनू यांनी फक्त भाषांतरच केले नाही, तर स्थानिक लोकांचे अनुभव नीट समजावून सांगण्याचे कामही केले.

या सत्रांमध्ये स्थानिक रिक्षाचालक किशोर पाटील यांनी आपले अनुभव सांगितले. शंतनूंनी त्यांचे विचार जगासमोर मांडले, त्यामुळे सामान्य लोकांचे मतही या चर्चेत आले. किशोरसारख्या लोकांचे आवाज जगापर्यंत पोहोचले पाहिजेत. हवामान बदलाचा परिणाम रोजच्या आयुष्यावर कसा होतो, हे फक्त आकड्यांमधून किंवा कागदावरून पूर्णपणे समजत नाही. या चर्चांमध्ये अन्न व्यवस्था आणि शेती यांचा हवामान बदलाशी असलेला संबंध यावरही चर्चा झाली.शंतनू यांचा हा सहभाग दाखवतो की अमळनेरसारख्या ठिकाणातील लोकही जागतिक चर्चांमध्ये आपला आवाज पोहोचवू शकतात.

# नारायण मूर्ति की सफलता की कहानी

सक्सेस स्टोरी

नारायण मूर्ति का जन्म २० अगस्त, १९४६ को मैसूर, भारत में हुआ था। उन्होंने मैसूर विश्वविद्यालय से इलेक्ट्रिकल इंजीनियरिंग में स्नातक की उपाधि प्राप्त की और फिर आईआईटी कानपुर से कंप्यूटर साइंस में मास्टर डिग्री प्राप्त की।नारायण मूर्ति ने अपने करियर की शुरुआत पाटनी कंप्यूटर सिस्टम्स में की, जहां उन्होंने छह साल तक काम किया। उन्होंने पाटनी कंप्यूटर सिस्टम्स को छोड़ दिया और अपने स्वयं के सॉफ्टवेयर कंपनी की स्थापना करने का फैसला किया।

नारायण मूर्ति और उनके छह दोस्तों ने इंफोसिस की स्थापना १०,००० रुपये की पूंजी से शुरू। कंपनी का पहला कार्यालय एक छोटे से अपार्टमेंट में था, और कंपनी में केवल छह कर्मचारी थे। इंफोसिस ने अपना पहला बड़ा अनुबंध, डेटा जनरल से $१ मिलियन का सौदा हासिल किया। १९९२ में इंफोसिस NASDAQ स्टॉक एक्सचेंज में सूचीबद्ध होने वाली पहली भारतीय आईटी कंपनी बनी। इंफोसिस ने अपना ग्लोबल डिलीवरी मॉडल लॉन्च किया, जिसने आईटी सेवाओं को वितरित करने के तरीके में क्रांति ला दी।हालांकि, कंपनी जल्दी से बढ़ी, २००२ में इंफोसिस १ अरब डॉलर के राजस्व का आंकड़ा पार करने वाली पहली भारतीय आईटी कंपनी बनी और २००८ में इन्फोसिस ने इन्फोसिस फाउंडेशन लॉन्च किया, जो एक गैर-लाभकारी संगठन है जो भारत में सामाजिक विकास परियोजनाओं पर काम करता है। २०११ में मूर्ति ने इंफोसिस के सीईओ पद से इस्तीफा दिया, लेकिन बोर्ड के अध्यक्ष और प्रबंध निदेशक हैं। उन्होंने कंपनी को एक वैश्विक नेता बनने में मदद की है, और इंफोसिस आज दुनिया भर में २,५०,००० से अधिक कर्मचारियों को रोजगार देती है। २०१४ में परिवर्तन के दौर में कंपनी की मदद करने के लिए मूर्ति इंफोसिस के कार्यकारी अध्यक्ष के रूप में लौटे। २०१७ में मूर्ति दूसरी बार इंफोसिस से सेवानिवृत्त हुए।नारायण मूर्ति को उनकी उपलब्धियों के लिए कई पुरस्कार और सम्मान मिले हैं।



# मठगव्हाण-रुंधाटीत दिवसाढवळ्या अवैध वृक्षतोड

## वन विभागाच्या मूकसंमतीने पर्यावरण प्रेमी संतप्त

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : गेल्या काही दिवसांपासून मठगव्हाण, रुंधाटी परिसरात दिवसाढवळ्या अवैध वृक्षतोड सुरू असून हिरवीगार झाडांची सर्रास कत्तल केली जात आहे. या प्रकाराबाबत माहिती देऊनही वन विभागाचे अधिकारी घटनास्थळी न पोहोचल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

दरवर्षी विविध शासकीय यंत्रणा व सामाजिक संस्थांकडून मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड केली जाते. मात्र रब्बी हंगाम संपताच काही लाकूड तस्करांकडून उन्हाळ्यात जिवंत झाडांची तोड सुरू होते. तालुक्यातील पातोंडा परिसरातील मठगव्हाण, रुंधाटी शिवारात निंब, बाभूळ यांसारखी मोठी डेरेदार झाडे मशीनच्या सहाय्याने तोडली जात असल्याचे उघड झाले आहे. शुक्रवारी रुंधाटी शिवारात सुरू असलेल्या वृक्षतोडीबाबत एका जागरूक शेतकऱ्याने संबंधितांना जाब विचारला असता त्यांनी कोणतीही माहिती देण्यास नकार दिला. उलट व्हिडिओ चित्रण सुरू असतानाही त्यांनी झाडे तोडणे थांबवले नाही. हा प्रकार सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. सदर घटनेची माहिती अमळनेर वन विभागाला देण्यात आली होती. मात्र संध्याकाळपर्यंत एकही अधिकारी किंवा कर्मचारी घटनास्थळी पोहोचला नसल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे वन विभाग या अवैध वृक्षतोडीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, दिवसा झाडे तोडून रात्रीच्या वेळी लाकडांची वाहतूक केली जात असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. ही वाहतूक रात्री गस्त घालणाऱ्या पोलिसांच्या नजरेतून कशी सुटते, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. अमळनेरचोपडा रस्त्यालगतही अनेक झाडांची तोड झाल्याचे निदर्शनास आले आहे.



### जिल्हास्तरावर तक्रार प्रणालीची मागणी

उन्हाळ्यात वाढणाऱ्या वृक्षतोडीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर ऑनलाईन हेल्पलाईन सुरू करावी, अशी मागणी वृक्षप्रेमी व ग्रामस्थांकडून होत आहे. तक्रार मिळताच संबंधित तालुक्यातील अधिकाऱ्यांना त्वरित सूचना देऊन कारवाई करावी, असे मत व्यक्त केले जात आहे. सध्या शेतकऱ्यांना वन विभागाशी संपर्क साधणे कठीण जात असून तक्रारींकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना आहे. वृक्षतोड रोखण्यासाठी प्रत्येक वनपालाने नियमित गस्त घालून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच जिल्हाधिकारी व जिल्हा वन अधिकाऱ्यांनी या प्रकरणात लक्ष घालावे, अशी मागणीही नागरिकांकडून करण्यात येत आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# अभिनय, अध्यात्म आणि राजकारणातील ‘ हे’ आहेत प्रवासी!

## सहा वर्षे लपवले कर्करोगाचे रहस्य; पत्रकार परिषदेतून केला धक्कादायक खुलासा



स्मृतिदिन विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बॉलीवूडचे सुपरस्टार विनोद खन्ना यांनी आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. पाकिस्तानमध्ये जन्मलेल्या विनोद खन्ना यांनी त्यांच्या कारकीर्दीत अनेक सुपरहीट चित्रपट दिले. त्यांचे व्यावसायिक यशापेक्षा वैयक्तिक आयुष्य नेहमीच जास्त चर्चेत राहिले. अभिनय, अध्यात्म आणि राजकारण असा त्यांचा जीवनप्रवास एखाद्या चित्रपटाच्या कथेपेक्षा कमी नव्हता.

**अभिनयापासून अध्यात्मापर्यंतचा प्रवास**

विनोद खन्ना यांनी बॉलीवूडमध्ये आपले स्टारडम निर्माण केले होते. मात्र, कारकीर्दीच्या शिखरावर असताना त्यांनी अचानक अध्यात्माचा मार्ग स्वीकारला. ओशो रजनीश यांच्यासोबत त्यांनी आध्यात्मिक प्रवास सुरू केला. हा निर्णय त्यांच्या चाहत्यांसह कुटुंबासाठीही धक्कादायक होता. काही काळ अध्यात्मात रमल्यानंतर ते पुन्हा अभिनयाच्या जगात परतले. त्यांनी आपली कारकीर्द यशस्वीपणे पुढे नेली.

**राजकारणातील यश**

अभिनयानंतर विनोद खन्ना यांनी राजकारणात प्रवेश केला. पंजाबमधील गुरुदासपूर मतदारसंघातून ते खासदार म्हणून निवडून आले. जनतेमध्ये लोकप्रिय झाले. त्यांच्या साध्या आणि प्रामाणिक स्वभावामुळे राजकीय क्षेत्रातही त्यांनी आपली छाप पाडली.

**कर्करोगाचे सहा वर्षे लपवलेले रहस्य**

विनोद खन्ना यांच्या अकाली निधनाने चाहत्यांना आणि कुटुंबाला मोठा धक्का बसला. त्यांच्या मृत्यूपूर्वी फार कमी लोकांना माहिती होते, की ते कर्करोगाशी झुंजत होते. जवळपास सहा वर्षे त्यांनी हा आजार जगापासून लपवून ठेवला. गुरुदासपूर येथील पत्रकार परिषदेत, ‘ तुम्ही इतके दिवस कुठे होता ’? या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी प्रथमच आपल्या कर्करोगाचा खुलासा केला. त्यांच्यावर उपचार सुरू होते आणि ते बरे होत असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र अखेर २७ एप्रिल २०१७ रोजी कर्करोगामुळेच त्यांचे निधन झाले. विनोद खन्ना यांचा अभिनय, अध्यात्म आणि राजकारणातील प्रवास प्रेरणादायी आहे. त्यांनी कर्करोगासारख्या गंभीर आजाराशी लढताना दाखविलेले धैर्य आणि त्यांचा सकारात्मक दृष्टिकोन आजही सर्वांना प्रेरणा देतो.



# शिमला–मनालीला धडक देतात ही ४ हिल स्टेशन...!

## पर्यटकांना मिळते शांतता आणि समाधान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गर्दी, आवाज आणि व्यापारीकरणापासून दूर राहून निसर्गाच्या सान्निध्यात जर तुम्हाला वेळ घालवायचा असेल तर पुढील पाच हिल स्टेशन आपल्यासाठी उत्तम पर्याय आहेत. जेथे आपणास केवळ निसर्गरम्य वातावरण नाही तर खऱ्या अर्थाने शांतता आणि समाधानही मिळेल. हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमधील लोकप्रिय पर्यटनस्थळांवर वाढती गर्दी आता पर्यावरणावर ताण आणू लागली आहे. अशा परिस्थितीत शांतता, निसर्ग आणि निवांत वेळ शोधणाऱ्या पर्यटकांसाठी काही हिल स्टेशन उत्तम पर्याय ठरत आहेत. चला जाणून घेऊया अशाच ४ सुंदर आणि शांत ठिकाणांबद्दल.सेराज व्हॅलीमध्ये असलेले शोजा हे एखाद्या परीकथेतील गावासारखे भासणारे ठिकाण आहे. दाट जंगले, धुक्याने झाकलेले डोंगर आणि शांत वातावरण हे याचे वैशिष्ट्य. येथे गजबजलेल्या कॅफे किंवा मॉल्स नाहीत पण लाकडी कॉटेज आणि सुंदर ट्रेकिंग रूट्स जरूर मिळतात.

ग्रेट हिमालयन नॅशनल पार्कजवळ असलेली तीर्थन व्हॅली निसर्गप्रेमींसाठी स्वर्गच आहे. स्वच्छ नदीकिनारे, ट्राउट मासेमारी आणि शांत असणारे हे ठिकाण खास बनते. इतर हिल स्टेशनच्या तुलनेत कमी व्यापारीकरण असल्याने येथे खऱ्या अर्थाने निवांतपणा अनुभवता येतो. उत्तराखंडमधील एक लपलेले रत्न म्हणजे चकराता. दाट जंगले, अप्रतिम दृश्ये आणि प्रसिद्ध टायगर फॉल्स यामुळे हे ठिकाण खास आहे. मसुरीच्या तुलनेत कमी गर्दी असल्याने शांततेचा अनुभव घेण्यासाठी हे उत्तम ठिकाण आहे.

समुद्रसपाटीपासून सुमारे ८५०० फूट उंचीवर वसलेले कनाताल ताज्या हवेसाठी आणि सुंदर दृश्यांसाठी ओळखले जाते. कॅम्पिंग, ट्रेकिंग आणि निसर्गभ्रमंतीसाठी हे ठिकाण परफेक्ट आहे.

# भारतातील ही आहे सर्वांत लहान नदी, लांबी फक्त...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



भारतात असंख्य नद्या आहेत. यातील काही नद्या आपल्या विशाल लांबीसाठी तर काही नद्या धार्मिक महत्त्वासाठी ओळखल्या जातात. मात्र आज आपण देशातील एका लहान नदीची माहिती जाणून घेणार आहोत. राजस्थानमधील अलवर जिल्ह्यात एक अशी नदी वाहते, जिची लांबी फक्त ४५ किलोमीटर आहे. मात्र तिची कहाणी मोठ्या नद्यांपेक्षाही अधिक प्रेरणादायी आहे. या नदीचे नाव अरवरी नदी आहे, जिला भारतातील सर्वात छोटी नदी म्हटले जाते.

अरवरी नदी राजस्थानच्या अलवर जिल्ह्यातील भानेटा गावातून उगम पावते. प्राचीन अरावली पर्वतरांगांमधून सुरू होणारी ही नदी राजस्थानच्या कोरड्या प्रदेशातून वाहत जाऊन शेवटी अलवरमधील सरस गावाजवळ साहिबी (साई) नदीला मिळते.

एक काळ असा होता, की अरवरी नदी पूर्णपणे आटली होती. बेछूट वृक्षतोड आणि भूजलाचा अतिवापर यामुळे जवळपास सहा दशके ही नदी अस्तित्वात नव्हती. अरवरी नदी आटणे हे राजस्थानमधील जलसंकटाचे गंभीर प्रतीक बनले होते.

१९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात परिस्थिती बदलली, जेव्हा तरुण भारत संघ आणि स्थानिक ग्रामस्थांनी हार मानली नाही. त्यांनी पारंपरिक जलसंधारण पद्धतींचा अवलंब केला. कोणत्याही सरकारी मदतीशिवाय ग्रामस्थांनी स्वतःच्या श्रमातून मातीचे छोटे-छोटे बंधारे बांधायला सुरुवात केली, ज्यांना स्थानिक भाषेत ‘जोहड’ म्हणतात.

या मातीच्या छोट्या बंधाऱ्यांचा उद्देश पावसाचे पाणी अडवणे होता, जेणेकरून ते वाहून जाऊन वाया न जाता जमिनीत मुरेल. हळूहळू या प्रयत्नांचा परिणाम दिसू लागला. भूजल पातळी वाढली आणि दशकांच्या शांततेनंतर अरवरी नदी पुन्हा वाहू लागली. आज ही नदी राजस्थानच्या कोरड्या भागातही वर्षभर वाहते.

# नॉर्मल अन् स्पीड पेट्रोलमध्ये नेमका फरक काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नॉर्मल पेट्रोल हे रोजच्या वापरासाठीच्या गाड्यांसाठी बनवलेले असते. शहरातली सामान्य ड्रायव्हिंग यावर सहज चालते.स्पीड पेट्रोल हे इंजिनची क्षमता वाढवण्यासाठी आणि परफॉर्मन्स सुधारण्यासाठी खास तयार केले जाते.नॉर्मल पेट्रोलचा ऑक्टेन ९१ असतो, तर स्पीड पेट्रोल ९३ ते ९७ पर्यंत असते .

स्पीड पेट्रोलमध्ये खास साफसफाई करणारे घटक असतात, जे इंजिन आतून स्वच्छ ठेवतात.स्पीड पेट्रोल वापरल्याने इंजिनमधील खटखट (नॉकिंग) आवाज कमी होतो आणि गाडी स्मूथ चालते.स्पीड पेट्रोल हे प्रीमियम दर्जाचं असल्यामुळे ते नॉर्मल पेट्रोलपेक्षा ५ ते १० रुपये महाग असते.हे पेट्रोल फ्यूल इंजेक्टर आणि वाल्ववर कार्बन जमा होऊ देत नाही, त्यामुळे इंजिनची आयुष्य वाढते.हाय-स्पीड आणि स्पोर्ट्स गाड्यांसाठी स्पीड पेट्रोल अधिक फायदेशीर ठरते, तर नॉर्मल पेट्रोल सर्वत्र सहज उपलब्ध असते.

# कुठे आणि कशा छापल्या जातात ५०० रुपयांच्या नोटा



## किती खर्च येतो, याचा आरबीआयने केला खुलासा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नुकत्याच प्रदर्शित झालेल्या ‘धुरंधर 2’ या चित्रपटात चित्रित केलेल्या नोटाबंदीच्या कथेवर मोठ्या प्रमाणावर चर्चा झाली आहे. सरकार आणि आरबीआय वेळोवेळी नोटाबंदी करत आहेत, ज्यात जुन्या नोटा चलनातून काढून नवीन नोटा आणल्या जात आहेत. आज देशातील सर्वात मोठी नोट ५०० रुपयांची आहे. १००० रुपयांच्या नोटा बंद करण्यात आल्या आहेत आणि २००० रुपयांच्या नोटाही चलनातून काढून टाकण्यात आल्या आहेत. आपण आणि तुम्ही दररोज मोठ्या खरेदी आणि व्यवहारांसाठी वापरत असलेली सर्वात मोठी नोट म्हणजे ५०० रुपयांची नोट. सध्याची ५०० रुपयांची नोट ही पूर्वीच्या ५०० रुपयांच्या नोटेपेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. तुम्हाला माहित आहे का या नोटा कशा तयार केल्या जातात? जेव्हा एखादी नवीन नोट चलनात येते, तेव्हा ती एका रात्रीत तयार होत नाही; ती एका लांबलचक डिझाइन, छपाई आणि टांकसाळीच्या प्रक्रियेतून जाते. देशात फक्त चार नोटा छापण्याचे कारखाने आहेत, जिथे कडक सुरक्षेखाली नोटा छापल्या जातात. आरबीआयने आपल्या अधिकृत वेबसाइटवर याबाबत सविस्तर माहिती दिली आहे.

केंद्रीय बँक, आरबीआयच्या मते, देशात चार नोटा छापण्याचे कारखाने आहेत. यापैकी दोन कारखाने थेट केंद्र सरकारच्या नियंत्रणाखाली आहेत, तर उर्वरित दोन आरबीआयच्या नियंत्रणाखाली आहेत.महाराष्ट्रातील नाशिक आणि मध्य प्रदेशातील देवास येथे असलेले नोटा छापण्याचे दोन कारखाने एसपीएमसीआयएल (सिक्युरिटी प्रिंटिंग अँड मिंटिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड) द्वारे चालवले आणि नियंत्रित केले जातात.या दोन कारखान्यांव्यतिरिक्त, इतर दोन कर्नाटकातील म्हैसूर आणि पश्चिम बंगालमधील सालबोनी येथे आहेत आणि ते बीआरबीएनएमपीएल (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया नोट प्रिंटिंग प्रायव्हेट लिमिटेड) द्वारे चालवले जातात.आरबीआयच्या मते, नोटा छापण्याचा अधिकार केवळ तिलाच आहे. आरबीआय नोटांची रचना, आकार आणि सामग्री यासंबंधी शिफारसी करते आणि केंद्र सरकार त्या आधारावर त्यांना मंजुरी देते. दरवर्षी, मध्यवर्ती बँक १०-२० रुपयांपासून ते ५०० रुपयांपर्यंतच्या विविध मूल्यांच्या नोटांची आवश्यक संख्या अंदाजे ठरवते आणि छापखान्याकडे मागणी नोंदवते.वापरामुळे नोटा जीर्ण होतात आणि फाटतात. त्यामुळे, नोटांची गुणवत्ता सुधारण्यासाठी, मध्यवर्ती बँक ‘स्वच्छ नोट धोरण’ अवलंबते. या धोरणांतर्गत, केवळ चांगल्या स्थितीत असलेल्या नोटाच पुन्हा जारी केल्या जातात, तर फाटलेल्या किंवा खराब झालेल्या नोटा मागे घेतल्या जातात आणि त्यांची विल्हेवाट लावली जाते.

कागदापासून ते छपाईपर्यंत, ५०० रुपये ची नोट छापण्यासाठी सरकारला अंदाजे ₹२.२९ खर्च येतो. हिरव्या रंगाच्या ₹५०० च्या नोटेवर महात्मा गांधींचे चित्र आणि लाल किल्ला आहे, ज्यामुळे ती अद्वितीय ठरते. त्यात अनेक सुरक्षा उपाययोजनाही आहेत.इतर नोटांबद्दल बोलायचे झाल्यास, ₹२०० ची नोट छापण्यासाठी सरकारला ₹२.३७ खर्च येतो. या पिवळ्या नोटेवर महात्मा गांधींचे चित्र आणि सांची स्तूपाचे चित्र आहे.त्याचप्रमाणे, ₹१०० ची नोट छापण्यासाठी सरकारला ₹१.७७ खर्च येतो, तर ₹१० आणि ₹२० च्या नोटा छापण्यासाठी सरकारला अंदाजे ९५ पैसे खर्च येतो.नोटांप्रमाणेच, नाण्यांची कहाणीही रंजक आहे, देशात चार टांकसाळी आहेत जिथे ती तयार केली जातात. यांचे उत्पादन मुंबई, हैदराबाद, कोलकाता आणि नोएडा येथील सिक्युरिटी प्रिंटिंग अँड मिंटिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड च्या टांकसाळींमध्ये केले जाते.

# रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील तेजस्वी सितारा : जोहरा सहगल



जन्मदिन विशेष

**ग्लोबल महातेज महातेज वृत्तसेवा**

भारतीय कलाविश्वाच्या इतिहासात जोहरा सहगल हे नाव एका अत्यंत प्रतिभावान, खंबीर आणि चिरतरुण अभिनेत्रीचे प्रतीक आहे. त्यांनी आपल्या अभिनयाने, नृत्याने आणि अद्वितीय व्यक्तिमत्त्वाने केवळ भारतातच नव्हे, तर जागतिक स्तरावर आपली मोहोर उमटवली.जोहरा सहगल यांचा जन्म २७ एप्रिल १९१२ रोजी उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथे एका कट्टर मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे बालपण अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात गेले, परंतु कलेची ओढ त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. त्यांचे प्राथमिक शिक्षण लाहोरमध्ये झाले. त्यानंतर, शिक्षणाची आवड असल्याने त्यांनी शिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रवासाचा मार्ग निवडला.जोहरा यांनी उदय शंकर यांच्या इंडियन कल्चरल सेंटरमध्ये नृत्य शिकायला सुरुवात केली. येथेच त्यांच्या कलाप्रवासाला खरी दिशा मिळाली.जोहरा सहगल यांचे करिअर सात दशकांहून अधिक काळ विस्तारलेले होते. उदय शंकर यांच्यासोबत त्यांनी जगभर प्रवास करून भारतीय नृत्याचा प्रसार केला. त्यांनी पृथ्वीराज कपूर यांच्या पृथ्वी थिएटरमध्येही काम केले. सुरुवातीच्या काळात त्यांनी अनेक हिंदी चित्रपटांमध्ये चरित्र अभिनेत्री म्हणून काम केले. वयाच्या ८०-९० व्या वर्षीही त्यांनी आपल्या अभिनयाची जादू कायम ठेवली होती.नीचा नगर ,चीनी कम,हम दिल दे चुके सनम, वीर-झारा आणि सावरिया या चित्रपटात भूमिका केल्या.जोहरा सहगल यांनी अनेक ब्रिटिश चित्रपटांमध्ये आणि मालिकांमध्ये बेंड इट लाइक बेकहॅम काम करून आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय कलाकारांची ओळख निर्माण केली.त्या एकाच वेळी उत्तम नृत्यांगना, कोरिओग्राफर आणि अभिनेत्री होत्या. जोहरा सहगल त्यांच्या वयाच्या शेवटच्या टप्प्यातही अतिशय उत्साही होत्या. त्यांच्या चेहऱ्यावरचे हास्य आणि त्यांची संवाद फेकण्याची शैली प्रेक्षकांना भुरळ घालत असे.त्यांनी युद्धकाळातील अडचणींपासून ते ग्लॅमरस चित्रपटसृष्टीपर्यंत सर्वच स्थित्यंतरे पाहिली आणि प्रत्येक ठिकाणी स्वतःला सिद्ध केले.त्यांच्या प्रदीर्घ आणि अमूल्य योगदानासाठी त्यांना अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरवण्यात आले. १९९८ मध्ये पद्मश्री,संगीत नाटक अकादमी फेलोशिप, २०१० मध्ये पद्मभूषण मिळाला.जोहरा सहगल यांचे १० जुलै २०१४ रोजी वयाच्या १०२ व्या वर्षी दिल्लीत निधन झाले. त्यांनी आपल्या मागे अभिनयाचा एक मोठा वारसा सोडून दिला आहे. आजची तरुण पिढी त्यांच्या आयुष्याकडे केवळ एक अभिनेत्री म्हणून नाही, तर एक जीवन जगण्याची जिद्द म्हणून पाहते.जोहरा सहगल म्हणजे जिवंत ऊर्जेचे दुसरे नाव होते. त्यांनी आपल्या कामातून दाखवून दिले की, कलेला वयाचे बंधन नसते.


शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




## नवनाथ बत्तिशी स्तोत्र ॥

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जय जयाजी गणधिपा, ॐ कराच्या सगुण स्वरोपा ॥
प्रथम नमुनी तुला बाप्पा ॥ माय सरस्वती वंदितो॥ १ ॥
आता वंदन श्री गुरुनाथा ॥ दत्तात्रेय स्वामी समर्थ ॥
तुझिया चरनी ठेविला माथा ॥ स्फुर्थी दया नाथ कथा वर्णाया॥ २॥
तुम्ही गुरु नवनाथांचे चरण धरिले मी तुमचे॥
लले पुरवा बालकाचे ॥ वाव्हे स्थिर हृदयी माझ्या ॥ ३॥
तुमच्या दिव्या चरनांचे ध्यान॥ मी करितो ध्यान
म्हणुनी वस्ति येउन ॥ अंतरी माझ्या करावी ॥ ४ ॥
ही तुमचीच आहे इच्छा ॥ म्हणुनी जाहली मनीषा ॥
नाथ प्रताप दिव्या भाषा ॥ कवन रुपे गावी वाटे ॥ ५॥
मर्त्य लोकी कलि येता॥ धर्म बुडाला सवर्था ॥
त्या वेळी गुरु नाथ ॥ घेवून आलात नाथाना॥ ६॥
प्रथम तो जहाला तो मछिन्द्रनाथ ॥ याचा जन्म मछली च्या उदरात॥
म्हणुनी नाम पावला तेच सत्य ॥ कलियुगी आले कवि नारायण ॥ ७॥
दूसरा तो जहाला जालंदरनाथ ॥ हा अंतरिक्ष नाथ नारायण समर्थ ॥
बरुहा द्रव राजाच्या यदन्न कुंडात॥ प्रगत झाला स्वामी माझा ॥ ८॥
तीसरा तो नागनाथ ॥ जन्म पावला नागिनिच्या उदरात ॥
हा अविर्होत्र नारायण समर्थ । धर्म रक्षान्या प्रगटलासे ॥ ९॥
चौथा तो रेवंनाथ ॥ चमस नारायण सिद्ध समर्थ ॥
त्याचाच हा अवतार सत्य ॥ मृत्यु लोकी प्र गट ला से ॥ १०॥
पाचवा तो गोरक्ष नाथ ॥ हा प्र गट ला उकिरडयात ॥
हरी नारायण अवतार सत्य ॥ महा समर्थ सिद्ध योगी॥ ११॥
पिप्पा ला यण नारायण समर्थ ॥ सहाव्या अवतारी प्र गट ला
नाम धरिले चर्पतिनाथ ॥ तारावया भाविकांना॥ १२॥
सातव्या अवतारी द्रमिल नारायण ॥ भरतुहारी म्हणुन ॥
आले अवतार धरून ॥ आद्र्या श्री हरीची म्हानुनिया ॥ १३॥
आठवा अवतार कानिफनाथ ॥ हा प्रबुद्ध नारायण समर्थ ॥
जन्म ला से गज कर्नात॥ सिद्ध योगी समर्थ हा ॥ १४॥
नवव्या अवतारी गहिनीनाथ ॥ कर्भंजन नारायण समर्थ ॥
मातीच्या पुतल्यात झाले प्रगट ॥ संजीवनी मंत्र जपता गोरक्षाने ॥
१५॥
ऐसे अस्ति नव नारायण ॥ अयोनि सम्भव यांचा जन्म ॥
यांची किमया जानन्या कोण ॥ समर्थ असे या धरेवरी॥ १६॥
असे नवनाथांचा भरी दरार ॥ काल कापे थरथरा ॥
देव दनावंचाही पारा ॥ उतरवला क्षणात नाथानी॥ १७ ॥
जो जो नित्य करील पठान ॥ दिव्य नवनाथांचे स्मरण ॥
त्याचे नासेल सारे दैन्य ॥ संसारी सुखी होइल तो ॥ १८॥

# गोत्राची खरी शक्ती आपणास माहिती आहे का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ही केवळ एक विधी नाही. अंधश्रद्धा तर मुळीच नाही. हे आहे आपले प्राचीन सांकेतिक वारसत्व, एक आत्मिक कोड. त्या अनुषंगाने आपण गोत्राची खरी शक्ती माहीत करून घेऊया.

१) गोत्र म्हणजे आडनाव नाही.

ते आपले आध्यात्मिक 'डीएनए' आहे. आपण बहुतेकजण गोत्राबद्दल पूर्णपणे अनभिज्ञ आहोत. आपण समजतो की पुजेमध्ये पुजारी जे काही म्हणतो त्याचा तो भाग आहे, पण ते तितकेच नाही. गोत्र म्हणजे आपण कोणत्या ऋषींच्या मनोवृत्तीशी जोडलेले आहात. हे रक्ताने नाही, तर विचारांनी, उर्जेने, कंपनांनी आणि ज्ञानधारेने जोडलेले असते. प्रत्येक हिंदूचा आत्मिक स्रोत एखाद्या ऋषीकडे जातो. तो ऋषी म्हणजे आपला बौद्धिक पूर्वज. त्याचे ज्ञान, मनोस्वभाव, अंतर्गत ऊर्जा हे सगळे आपल्यात वाहत असते.

२) गोत्र म्हणजे जात नाही

आज बरेच लोक गोत्र आणि जात एकत्र करून पाहतात. पण गोत्र हे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्र याचे प्रतीक नाही. ते जातप्रथा, आडनाव, आणि राज्ये उदयास येण्यापूर्वीच अस्तित्वात होते. गोत्र म्हणजे ज्ञानाधारित ओळखसत्ताधारित नव्हे. ज्यांनी ऋषींचे शिक्षण प्रामाणिकपणे आत्मसात केले, त्यांनाही ऋषी गोत्र देत असत. हे कमावलेले असते. जन्मसिद्ध नव्हे. म्हणून गोत्र हे आपल्या आध्यात्मिक परंपरेचा एक शिक्का आहे.

३) प्रत्येक गोत्र एखाद्या ऋषीकडून उगम पावलेले असते एका सुपरमाइंडकडून

उदा.- आपण वसिष्ठ गोत्रातील असाल, तर त्या वसिष्ठ ऋषींच्या परंपरेतील आहात ज्यांनी श्रीराम आणि दशरथ राजा यांना मार्गदर्शन केले. भरद्वाज गोत्रातील असाल, तर आपण त्या ऋषींच्या वंशातील आहात ज्यांनी वेदांचे अंश लिहिले, योद्धे आणि पंडित घडवले. प्रमुख ४९ गोत्र आहेत. प्रत्येक ऋषी वैज्ञानिक, योद्धा, मंत्रद्रष्टा, वैद्य किंवा खगोलतज्ज्ञ होते.

४) एकाच गोत्रातील विवाहास वडीलधारी मंडळींनी का मनाई केली?

प्राचीन भारतात गोत्राचा वापर जनुकीय ओळख राखण्यासाठी होत असे. गोत्र पुरुषवर्गातून पुढे जाते, म्हणजे मुलगा ऋषीवंश पुढे नेत असतो. एकाच गोत्रात विवाह केला, तर दोघेही अनुवांशिकदृष्ट्या खूप जवळचे म्हणजे बहीण-भावासारखे असतात. यामुळे संततीमध्ये मानसिक व शारीरिक दोष होऊ शकतात. गोत्रपद्धती म्हणजे प्राचीन भारतीय जनुकीयशास्त्र. आपण हे हजारो वर्षांपूर्वीच ओळखले होते जे पाश्चात्यशास्त्राने अलीकडेच शोधले.

५) गोत्र म्हणजे आपले मानसिक संप्रेषण

काही लोक जन्मतःच विचारवंत असतात. काहींच्या आत्म्यात आध्यात्मिक तहान असते. काहींना निसर्गात शांतता वाटते. काही स्वाभाविक नेते असतात. का? कारण आपल्या गोत्रातील ऋषींचे मन अजूनही आपले अंतरंग घडवत असते. तो ऋषी जसा विचार करत होता, जसे अनुभवत होता, जसा प्रार्थना करत होता तसेच काहीसे आपल्या विचारांमध्ये झलकत असते. ही जादू नाही तर ही आहे डीप कोडिंग.

६) गोत्राचा उपयोग शिक्षणपद्धती ठरविण्यासाठी होत असे

प्राचीन गुरुकुलात प्रत्येकाला एकसारखे शिकवले जात नसे. गुरू पहिलाच प्रश्न विचारत : 'बाळा, तुझे गोत्र काय?' हे का विचारायचे? कारण त्यातून समजायचे की कोणत्या प्रकारचे ज्ञान त्या विद्यार्थ्यास योग्य आहे. कोणते मंत्र त्याच्या उर्जेला सुसंगत आहेत. उदा.- अत्री गोत्राचा विद्यार्थी ध्यान आणि मंत्रविद्येत पारंगत होतो. कश्यप गोत्राचा विद्यार्थी आयुर्वेदात गूढ प्रवेश करतो. गोत्र म्हणजे शिक्षणशैली, जीवनमार्ग आणि आत्मस्वरूप.

७) ब्रिटिशांनी याची थट्टा केली आणि आपण विसरलो

जेव्हा ब्रिटीश भारतात आले तेव्हा त्यांनी गोत्रपद्धतीला अंधश्रद्धा म्हणून हिणवले. बॉलीवूडने पुजाऱ्यांच्या गोत्र विचारण्याची चेष्टा केली आणि हळूहळू आपण आपल्या आजी-आजोबांना विचारणे थांबवले, आपल्या मुलांना सांगणे बंद केले. दहा हजार वर्षांची परंपरा फक्त शंभर वर्षांत हरवली. कोणी नष्ट केली नाहीआपणच विसरलो.

८) जर आपल्याला गोत्र माहीत नसेल तर आपण एक नकाशा गमावला आहे

कल्पना करा, की आपण एखाद्या प्राचीन राजघराण्यातील आहात. पण



आपले आडनाव काय आहे हेच माहीत नाही. तसेच आहे गोत्राचे महत्त्व. गोत्र म्हणजे तुमचे आध्यात्मिक जीपीएस जे तुम्हाला योग्य मंत्र, विधी, ऊर्जा उपचार, वैयक्तिक साधना आणि विवाहासाठी योग्य जोड मिळविण्यासाठी मार्ग दाखविते. गोत्राशिवाय आपण धर्माच्या वाटेवर अंधारात चालणारे होतो.

९) गोत्र सांगणे हे 'फक्त औपचारिकता' नव्हते

पुजेमध्ये पंडित जेव्हा आपले गोत्र उच्चारतो तेव्हा तो केवळ एक विधी करत नसतो, तर तो आपल्याला ऋषी-परंपरेशी पुन्हा जोडत असतो. आपल्या आत्मिक वंशपरंपरेला साक्षी म्हणून बोलावतो आणि आशीर्वादाची वाट मोकळी करतो. म्हणूनच संकल्पात गोत्र सांगणे हे अत्यंत पवित्र विधान असते. 'मी, भरद्वाज ऋषींचा वंशज, पूर्ण आत्मचेतनेने देवतांचे साहाय्य मागतो.'

१०) आपले गोत्र जतन करा. उशीर होण्याआधी आई-वडिलांना, आजी-आजोबांना विचारा. माहिती नसेल, तर शोधा. पण ते माहीत नसणे म्हणजे आपली मुळे विसरणे. ते लिहून ठेवा, मुलांना सांगा आणि अभिमानाने उच्चारा. आपण २००० या वर्षात जन्मलेले असाल तरी आपले गोत्र हजारो वर्षांपूर्वीच्या ऋषीने पेटविलेली दिव्य ज्योत आहे. आपण त्या अजरामर कथेचे आत्ताचे शेवटचे पान आहात.

११) आपले गोत्र म्हणजे आत्म्याचे विसरलेले पासवर्ड

आज आपण वाय-फाय पासवर्ड, ई-मेल लॉगिन, नेटफ्लिक्स कोड लक्षात ठेवतो. पण सगळ्यात जुना पासवर्ड आपले गोत्र विसरतो. तो एकच शब्द आपल्या पूर्वजांचे ज्ञान, मानसिक सवयी, कर्माचे संस्कार आणि आत्मिक बल उघडू शकतो. हे फक्त एक लेबल नाही ही एक किल्ली आहे. ती वापरा नाहीतर गमवा.

१२) स्त्रिया विवाहानंतर गोत्र 'गमावत' नाहीत. त्या ते मौनपणे जपत असतात

अनेकांना वाटते, की लग्नानंतर स्त्रियांचे गोत्र बदलते. पण सनातन धर्म अतिशय सूक्ष्म आहे. श्राद्ध विधीत स्त्रीचे गोत्र वडिलांकडून घेतले जाते. कारण गोत्र वाय-क्रोमोसोमने पुरुषवाटे पुढे जाते. स्त्रिया गोत्राची ऊर्जा वाहक असतात, पण ते आनुवंशिकदृष्ट्या पुढे नेत नाहीत. म्हणून स्त्रीचे गोत्र लग्नानंतरही तिच्या अस्तित्वात जीवंत असते.

१३) देवांनीसुद्धा गोत्र नियम पाळले होते

रामायणात जेव्हा प्रभू श्रीरामचंद्र आणि सीतेचे लग्न झाले तेव्हा त्यांचे गोत्र तपासले गेले.

श्रीराम : इक्ष्वाकु वंश, वसिष्ठ गोत्र
सीता : जनक राजा यांची कन्या, कश्यप गोत्र

प्रेमाखातर त्यांनी धर्माचे नियम झुगारले नाहीत. देवसुद्धा गोत्रसंहिता पाळत होते, हे याचे महत्त्व सिद्ध करते.

१४) गोत्र आणि प्रारब्ध कर्म यांचा संबंध आहे

कधी असे वाटते का, की लहानपणापासून तुम्ही काही विशिष्ट गोष्टींमध्ये आकर्षित होता? ते प्रारब्ध कर्म असते. या जन्मात फळ देणारी कर्मबीजे. प्रत्येक ऋषींच्या कर्मधारा वेगळ्या होत्या. आपण त्यांच्या गोत्रात असल्यामुळे ती कर्मसंस्कृती आपल्यावरही असते. गोत्र समजणे म्हणजे आपले कर्ममार्ग जाणून घेण्याची गुरुकिल्ली.

१५) प्रत्येक गोत्राशी विशिष्ट देवता आणि बीजमंत्र जोडलेले असतात

गोत्र म्हणजे केवळ मनोवृत्ती नव्हे. ते विशिष्ट देवता आणि बीजमंत्रांशी सुसंगत असते. कधी वाटते का की एखादा मंत्र 'काम करत' नाही? कदाचित तुम्ही तुमच्या आत्मिक उर्जेला सुसंगत मंत्र न वापरताय. योग्य गोत्र + योग्य मंत्र = आध्यात्मिक प्रवाह. हे समजल्यास ध्यान, साधना आणि उपचारशक्ती १० पट वाढते.

१६) गोत्र = अंतःप्रेरणा गोंधळात

आज बरेच लोक हरवलेले वाटतात उद्दिष्ट काय? जीवनमार्ग कोणता? नातेसंबंध कसे असावेत? पण जर तुम्ही शांत बसलात आणि तुमचे गोत्र, ऋषी, परंपरा यांचा विचार केला, तर अंतःप्रेरणा जागृत होते. तुमचा ऋषी गोंधळात नव्हता. त्याची विचारलहर अजूनही तुमच्या नसानसांत आहे. तिला अनुसरले, तर स्पष्टता मिळते.

१७) प्रत्येक थोर हिंदू सम्राटाने गोत्राचा सन्मान केला

चंद्रगुप्त मौर्य, हर्षवर्धन, शिवाजी महाराज सगळ्यांनी राजगुरू नेमले, जे कुल, गोत्र आणि परंपरा यांची नोंद ठेवत. राजकीय आणि सामाजिक निर्णय घ्यायचाही आधार गोत्रावर असायचा. गोत्र म्हणजे केवळ एक ओळख नव्हे ती संस्कृतीची शिरा आहे. तिला दुर्लक्ष करणे म्हणजे आपल्या मुळालाच नाकारणे.

१८) गोत्र पद्धतीने स्त्रियांना संरक्षण दिले

आधुनिक भाषेत बोलायचे झाले, तर गोत्र ट्रॅकिंग ही एक सुरक्षाव्यवस्था होती. ती पिढीतील विवाह टाळण्यासाठी, रक्तसंबंध जपण्यासाठी आणि स्त्रियांच्या सन्मानासाठी होती. युद्धात हरवलेल्या किंवा अपहृत स्त्रियांनाही त्यांच्या गोत्रामुळे पुन्हा समाजात स्थान मिळविता आले. ही मागासपणा नव्हे ही पुरातन बुद्धिमत्ता होती.

१९) गोत्र म्हणजे आपली कॉस्मिक भूमिका

प्रत्येक ऋषी ब्रह्मांडासाठी एका विशिष्ट कार्यासाठी झटत होता. काही शरीरोपचारात पारंगत. काही खगोलशास्त्रज्ञ. काही धर्मरक्षक. काही न्यायसंस्थापक. आपले गोत्र त्या उद्देशाचे पडसाद घेऊन येते. आपल्याला आयुष्यात रिकामेपण जाणवते? कदाचित आपण ब्रह्मांडीय भूमिका विसरलात. गोत्र शोधा. भूमिका सापडेल.

२०) हे धर्माबद्दल नाही ही ओळखीबद्दल आहे

आपण नास्तिक असाल, फक्त आध्यात्मिक असाल, विधी-धर्माबद्दल गोंधळलेले असाल तरीही गोत्र महत्त्वाचे आहे. कारण हे धर्मापलीकडचे आहे. हे आहे पूर्वजांचे भान. हे आहे भारतीय तत्त्वज्ञानाचे मौन मार्गदर्शन. त्यावर विश्वास ठेवणे गरजेचे नाही. पण ते आठवणे गरजेचे आहे.

अंतिम शब्द

आपले नाव आधुनिक असू शकते. आपली जीवनशैली जागतिक असू शकते. पण आपले गोत्र कालातीत आहे आणि जर आपण त्याकडे दुर्लक्ष केले, तर आपण त्या नदीसारखे आहात. जी आपला उगम विसरलेली आहे. गोत्र म्हणजे भूतकाळ नव्हे ते भविष्यातील ज्ञानाचे पासवर्ड आहे. ते उघडा आणि पुढच्या पिढीला ते हरवू देऊ नका.

# मंदिराच्या बाहेर कासव का असते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कासव म्हणजे श्रीविष्णूचा साक्षात कूर्म अवतार आहेत. कासव हा जीव सत्त्वगुणप्रधान असतो. कासवाला श्रीविष्णूकडून तसे वरदान मिळाले आहे. त्यामुळे प्रत्येक मंदिराच्या गाभाऱ्यासमोर कासव असते.कासवाला सत्त्वगुणामुळे ज्ञान प्राप्त झाले आहे. कासव हे श्रीविष्णूला शरण आले होते. यामुळे कासवाची मान सदैव खाली वाकलेली असते. त्याचे लक्ष नेहमी देवतेच्या चरणांकडे असते.

काही मंदिरांमध्ये कासवाची मान वर उचललेली दिसते. मान वर उचलणे म्हणजे कुंडलिनी जागृत होणे. श्रीविष्णूच्या आशीर्वादाने कासवाची कुंडलिनी शक्ती जागृत झाली आहे. आध्यात्मिक उन्नतीची इच्छा जागृत होण्यासाठी कासव मंदिरात कायमस्वरूपी राहते.



कासवाचे गुण

१) कासवाला ६ पाय असतात तसेच माणसाला ६ शत्रू असतात. काम, क्रोध, मोह, लोभ, मोह आणि मत्सर कासव हे सर्व सोडून नतमस्तक होते त्याप्रमाणे भक्तानेही हे सर्व सोडून मंदिरात यावे.

२) कासव हे आपल्या पिलाना डोळ्यातुन प्रेम देऊन वाढवते त्याचप्रमाणे देवाने आपल्यावर कृपादृष्टी ठेवावी ही भावना आहे.

३) कासव आपली अष्ट अंग नमस्कार करते त्याप्रमाणे आपणही करावा. याकरिता कासव मंदिरात असते.

४) कासव ज्याप्रमाणे त्याची सर्व इंद्रिये त्याच्या इच्छेने संकोचून घेऊ शकते त्याप्रमाणे मंदिरात देवासामोर जाताना भक्ताचा इंद्रियनिग्रह, इंद्रियांवर ताबा असणे महत्त्वाचे आहे. इंद्रिये मोकाट सोडून परमेश्वराची भक्ती होऊ शकत नाही हे कासव आपल्याला शिकविते.

कासवाला नमस्कार करून मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश करण्याचा भावार्थ

'कासवाला नमस्कार करूनच मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश करण्याची पद्धत आहे. याचा भावार्थ कासवाच्या अंगी असलेल्या गुणांची जोपासना केल्यावरच ईश्वराचे खरे दर्शन घडते', असा आहे. आपणास माहिती आहे का कासव (मादी) ही आपल्या पिलांना कधीच दूध पाजत नसते. तिने आपल्या पिलांच्या डोळ्यांत वात्सल्य भावनेतून पाहिले की पिलाचे पोट भरते. त्याप्रमाणे आपण मंदिरात देवाच्या दर्शनाला गेलो असता देवाने आपल्याकडे वात्सल्य भावनेने पाहावे. ज्यामुळे न मागता आपल्या सर्व इच्छा पूर्ण व्हाव्यात, या उद्देशाने कासव मंदिरात देवाच्या समोर असते. कासव म्हणजे श्रीविष्णूचा साक्षात कूर्मावतार आहेत. श्रीविष्णूंच्या आशीर्वादामुळे प्रत्येक मंदिराच्या गाभाऱ्यासमोर कासव असते.

# वैशाख महिना सर्वात पवित्र का आहे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



हिंदू धर्मात, वैशाख महिना अत्यंत पवित्र आणि श्रेष्ठ मानला जातो. धर्मग्रंथात म्हटले आहे, "वैशाखासारखा महिना नाही, सत्ययुगासारखे युग नाही, वेदांसारखे धर्मग्रंथ नाहीत आणि गंगेसारखे तीर्थक्षेत्र नाही." या विशेष गुणधर्मामुळे, सर्व महिन्यांमध्ये या महिन्याला उच्च स्थान आहे. असे मानले जाते की, याच महिन्यात भगवान विष्णूंनी मधु राक्षसाचा वध केला होता, म्हणूनच या महिन्याला 'माधव महिना' असेही म्हटले जाते.पुराणांनुसार, देवऋषी नारदांनी राजा अंबरीषाला सांगितले की, स्वतः ब्रह्मदेवाने वैशाख महिन्याला सर्व महिन्यांमध्ये श्रेष्ठ घोषित केले आहे.

या महिन्यात, सर्व तीर्थक्षेत्रे, देवदेवता आणि पवित्र शक्ती पाण्यात वास करतात. वैशाख महिन्यात सकाळच्या स्नानांना विशेष महत्त्व आहे. पद्म पुराणानुसार, या महिन्यात सूर्योदयापूर्वी स्नान करणे हे अश्वमेध यज्ञ करण्याइतकेच फलदायी मानले जाते. वैशाख शुक्ल एकादशीपासून पौर्णिमेपर्यंतच्या पाच दिवसांत स्नान करणे विशेष पुण्यकारक मानले जाते. असे मानले जाते की, या पाच दिवसांत स्नान केल्याने महिनाभर तसेच वर्षभर धार्मिक कार्यांचे फळ मिळते.या महिन्यात गंगा, गोदावरी, यमुना, सरस्वती, कावेरी, नर्मदा आणि वेणी या सात पवित्र नद्यांपैकी कोणत्याही नदीत स्नान केल्याने मोक्षप्राप्ती होते. एका आख्यायिकेनुसार, राजा महिरथाने वैशाख महिन्यात केवळ स्नान करून मोक्ष प्राप्त केला होता, जे या महिन्याचे महत्त्व दर्शवते.

वैशाख पौर्णिमेच्या दिवशी तिळाची उत्पत्ती झाली असे मानले जाते. एका आख्यायिकेनुसार, काळे आणि पांढरे तीळ भगवान विष्णूच्या घामातून निर्माण झाले. त्यामुळे, या महिन्यात धार्मिक विधींमध्ये तिळाला विशेष महत्त्व आहे. लक्ष्मी पूजेत पांढरे तीळ, तर विष्णू पूजेत काळे तीळ वापरले जातात. पाणी, छत्र्या, पंखे, चटया आणि जोड्या दान करणे हे देखील अत्यंत पुण्यकर्म मानले जाते.ज्याप्रमाणे माघ महिन्यात प्रयागमधील कल्पवांना महत्त्व आहे, त्याचप्रमाणे वैशाख महिन्यात उज्जैनमधील कल्पवांना विशेष महत्त्व आहे. या काळात तेथे राहणारे लोक शिवाचे अवतार बनतात आणि त्यांना विशेष आध्यात्मिक लाभ मिळतात.अशा प्रकारे, वैशाख महिना हा केवळ धार्मिक भक्तीचा काळच नव्हे, तर आध्यात्मिक प्रगती आणि पुण्यसंचयासाठी एक उत्तम संधी म्हणूनही मानला जातो.

# पुरुषांनी साष्टांग नमस्कार घालावा, पण स्त्रियांनी नाही; असे का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नमस्काराच्या पद्धतीतून व्यक्तीचे संस्कार दिसून येतात, असे म्हणतात. नमस्कार करण्यात नम्र भाव असतो. जी व्यक्ती जेवढी नम्र आणि कृतज्ञ तेवढी जास्त झुकते आणि जिच्या ठायी अहंकार असतो, ती ताठ राहते. परंतु, ज्येष्ठ-श्रेष्ठ लोकांपुढे, माता-पित्यांपुढे, वडिलधाऱ्या मंडळींपुढे, अनुभवी लोकांपुढे, गुरूपुढे आणि परमेश्वरापुढे झुकलेच पाहिजे, असे आपली संस्कृती सांगते. परंतु आजच्या काळात नमस्कार करणे, हे कमीपणाचे वाटते. नमस्कार कर, असे मुलांना सांगावे लागते. कारण मोठी मंडळीच नमस्कार करताना आढळत नाहीत. मात्र पूर्वी साष्टांग नमस्कार, गुडघ्यावर बसून डोके टेकवून नमस्कार किंवा येता जाता राम राम म्हणत अभिवादन करणे ही सवयच लोकांच्या अंगवळणी पडली होती.

पूजेत जे षोडशोपचार आहेत, त्यातील नमस्कार हा एक उपचारच आहे. दोन्ही हात जोडून मस्तक नत करणे म्हणजे नमस्कार. देव देवतांविषयी मनात असलेली श्रद्धा त्यातून प्रगट होत असते. नमन, प्रणाम, प्रणती, नती, दंडवत असेही शब्द नमस्काराला आहेत.

या नमस्कारात तीन मुख्य प्रकार आहेत. कायिक, वाचिक आणि मानसिक हे ते तीन प्रकार आहेत. कायिक म्हणजे साष्टांग नमस्कार होय. तिन्ही नमस्कारात हा सर्वश्रेष्ठ मानला जातो. कारण, हा नमस्कार करते वेळी हृदय, माथा, पाय, गुडघे आणि हात ही शरीराची आठही अंगे जमिनीला टेकतात, म्हणून याला अष्टांग प्रणाम असेही म्हणतात. या अष्टांग नमस्कारामध्ये शारीरिक प्राणायामबरोबरच मानसिक नमन किंवा प्रणामही अभिप्रेत असतो. सूर्याला किंवा देवांना प्रामुख्याने साष्टांग नमस्कार घालण्यात येतो. हा नमस्कार व्यायामाचाही उत्कृष्ट प्रकार आहे.

**स्त्रियांनी साष्टांग नमस्कार घालू नये, कारण...**

स्त्रियांचा गर्भ आणि वक्ष जमिनीला टेकू नये हे त्यामागचे मुख्य कारण आहे. कारण जमीन अर्थात भूमी जे कार्य करते, तेच स्त्रीदेखील करते. गर्भातून नव्या जीवाला जन्म देते आणि वक्षाने त्या जीवाचे पालन पोषण करते. म्हणून तिने अष्ट अंगांमधील ही दोन्ही अंग जमिनीला न टेकवता गुडघ्यावर बसून डोकं जमिनीला टेकवत नमस्कार करावा, असे शास्त्र सांगते.

याशिवाय, हरि ॐ, राम राम, हर हर महादेव, जय जय रघुवीर समर्थ, असे आपण वाचेने मंदिरात गेल्यावर म्हणतो, हा एक प्रकारचा वाचिक नमस्कारच आहे. विशेषतः आंघोळ करताना जुन्या पिढीतील मंडळी 'हरगंगे भागीरथी' असे म्हणतात. गंगेला तर हिंदुमात्रांच्या जीवनात अनन्यसाधारण भक्तिभावनेचे स्थान आहे. जीवनात एकदा कधी तरी काशीला हरीद्वारला जाऊन आल्यावर तेथील गंगेचे वा अशा दूरच्या कोणत्याही देवतेचे स्मरण करून ती मनापुढे आणणे, हा झाला मानसिक नमस्कार. तेथे जाणे शक्य झाले नसेल, तरी वाचिक नमस्कार केला तरी चालतो. म्हणून यापुढे नमस्कार करताना कुठलीही लाज न बाळगता कायिक, वाचिक किंवा मानसिक नमस्कार अवश्य करा आणि पुढच्या पिढीवरही हा संस्कार घाला.

**। गुरुदेव दत्त।**



**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**